सोमवार, दि. १७ नोव्हेबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ८४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### विभागीयस्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धा; नवा 'पायंडा'? क्रीडा जगतात आश्चर्य

# 'टॉस'द्वारे निकाल; नियमांचा भंग?

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथे शनिवारी (दि. १५ नोव्हेंबर २०२५) विभागीयस्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धा २०२५-२६ उत्साहात पार पडली. छत्रपती संभाजीनगर, छ. संभाजीनगर ग्रामीण, जालना, बीड, परभणी शहर, परभणी ग्रामीण व हिंगोली जिल्ह्यांतील मुला-मुलींनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

मात्र १७ वर्षाखालील मुलींच्या गटातील एका महत्त्वाच्या बाऊटमध्ये दोन्ही खेळाडूंचे पॉईंट समान (झेळपीं एर्रिश्र) झाल्यानंतर विजयी खेळाडू ठरविण्याची पद्धत सर्वांना धक्का देणारी ठरली. नियमांचा आधार न घेता पंचांनी 'टॉस' करून एक खेळाडू विजयी आणि दुसरी खेळाडू बाद झाल्याचे समोर आले आहे.

**कराटे स्पर्धेतील अधिकृत नियम काय सांगतात?**

कराटे फेडरेशनचे (KF I / WKF) नियम स्पष्ट आहेत, पॉईंट सारखे झाल्यास कधीही टॉसद्वारे विजय निश्चित केला जात नाही. नियमंनुसार निर्णय खालील क्रमाने घेतला जातो. SENSU / SNBON नियम (पहिला गुण कोणी घेतला?) ज्याने पहिला 'साको/सेंशू' पाईंट मिळवला असेल, त्याला प्राधान्य दिले जाते.

HNTEI (जजांचा सामूहिक निर्णय) जर पहिला पाईंट रद्द झाला असेल किंवा उपलब्ध नसेल, तर चार जज + रेफ्री मिळून फ्लॅगद्वारे ज्याची फाईट टेक्निक उत्तम, आक्रमकता, कंट्रोल, आत्मविश्वास, तो खेळाडू निवडतात.

पॉइंट्स समान असले तरी निर्णय कौशल्यावर आधारित केला जातो; टॉस कधीच वापरला जात नाही.

**जालना स्पर्धेत नवा 'पायंडा'? क्रीडा जगतात आश्चर्य**

वरील नियमांची स्पष्ट माहिती असतानाही जालना जिल्हा क्रीडा विभागाने टॉसद्वारे निकाल जाहीर केल्याने क्रीडा क्षेत्रात आश्चर्य व्यक्त होत आहे. कराटे हा कौशल्य, नियंत्रण आणि मानसिक स्थिरता मोजणारा खेळ आहे. अशा खेळात नशिबावर आधारित 'टॉस' ही पद्धत खेळाडूवृत्तीला धरून नाही, अशी नाराजी प्रशिक्षक आणि खेळाडू व्यक्त करत आहेत.

**खेळाडूंची भावना : आम्ही मेहनत करतो, निकाल मात्र नशिबावर?**

एकीकडे स्पर्धांसाठी महिनोन्-महिने तयारी, कठोर प्रशिक्षण, खर्च, डाएट, आणि शेवटी निकाल एका नाण्याच्या 'हेड-टेल'वर ठरवला गेला, हे खेळाडूंना धक्कादायक असल्याचे मत सर्वत्र व्यक्त होत आहे.

**उच्चस्तरीय चौकशीची मागणी**

या प्रकरणी संबंधित विभागीय क्रीडा अधिकारी व राष्ट्रीय कराटे फेडरेशनकडून उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, आणि खेळाडूंना न्याय देण्यात यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

**खेळ नियमांचे पालन का महत्त्वाचे?**

चुकीची पद्धत वापरल्यास उद्या राष्ट्रीय पातळीवरील निवडही प्रश्नांखाली



येऊ शकते. चुकीच्या निर्णयामुळे लायक खेळाडूची संधी हिरावली जाऊ शकते. क्रीडा स्पर्धांची विश्वसनीयता आणि प्रामाणिकपणा धोक्यात येतो. खेळाडूंचा उत्साह खच्चीकरण्याचा धोका निर्माण होतो. विभागीय पातळीवरील शालेय कराटे स्पर्धेत घेतलेला हा अपारंपरिक निर्णय केवळ नियमबाह्य नाही, तर कराटेसारख्या आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त खेळाच्या तत्त्वांना धक्का देणारा आहे. या प्रकाराची चौकशी होऊन कराटे नियमांचे काटेकोर पालन व्हावे, अशी मागणी सर्व खेळाडू व पालकांकडून जोर धरत आहे.

# खेड आणि जामखेडमध्येही होणार क्रिकेट स्टेडियम

### 'एमसीए' आणि आ. रोहित पवार यांचा संयुक्त उपक्रम

**कर्जत । जामखेड । प्रतिनिधी -** कर्जत-जामखेड मतदारसंघात राशीनसह खेड आणि जामखेड अशा तीन ठिकाणी क्रिकेट स्टेडियमची उभारणी करण्यात येणार आहे. राशीन आणि खेड या ठिकाणी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आणि आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून तर जामखेड या ठिकाणी आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून स्वखर्चातून स्टेडियमची उभारणी करण्यात येणार आहे. गेल्या तीन वर्षांपासून 'महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन'च्या माध्यमातून संपूर्ण राज्यभरात किक्रेट खेळाडूंसाठी पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. राज्यात आतापर्यंत गहुंजे (पुणे), धुळे (कुंडाणे) आणि लातूर या तीनच ठिकाणी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मालकीचे पान २ वर

> ''राज्यात अनेक होतकरू आणि गुणी खेळाडू असून त्यांच्यात मोठ्या प्रमाणात पोटेन्शिअल आहे. त्यांना केवळ पायाभूत सुविधा आणि योग्य संधीची गरज आहे. ती मिळाली तर तेही राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर चमकल्याशिवाय राहणार नाहीत. त्यासाठी संपूर्ण राज्यभरातील क्रिकेट खेळाडूंना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा प्रयत्न असून यामध्ये महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचं मोठं सहकार्य आहे. कर्जत-जामखेड मतदारसंघात डॉ. कुमार सप्तर्षी साहेब यांच्या संस्थेने आणि 'रयत'ने जागा देऊ केल्यामुळं तिथं हे ग्राऊंड बनवण्यात येत आहे. हे ग्राऊंड झाल्यानंतर येथील खेळाडूही राज्याचा नावलौकिक वाढवल्याशिवाय राहणार नाहीत, असा विश्वास आहे.''
>
> **- रोहित पवार (अध्यक्ष, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, आमदार, कर्जत-जामखेड)**

युवा आदर्श

**हृदयसम्राट ...**

हिंदू हृदयाचे सम्राट
आम्हां सदैवआधार
पटायला लागे सर्वां
आपले सुवर्णविचार
जसे मनी सुविचार
तसा सदैव आचार
आठवणी तयांच्या
होती सहज संस्कार
मिळे कधी तुरे हार
कधी कधी होय हार
प्रयास करती अपार
सेतुबंधनी जशीखार
चालू दावलेली वाट
समजून घेऊन सार
उतराई न उपकार
नमन तुम्हां त्रिवार
आदरणीय हिंदुत्व
झणझणीत पत्रकार
ऐकत रहावे भाषण
कानी घुमे टणकार
लेखणी अति देखणी
सार्थ व्यंगचित्रकार
मना मात्र व्यंग नाही
कार्मिक सामनाकार
शिवरायाचे अनुयायी
तुम्हां खरा अधिकार
पिढ्यापिढ्या गाजेलं
साहेबा तव जयकार

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### राष्ट्रवादीच्या इच्छुकांनी मोठी गर्दी केल्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह उफाळून आला

# महापालिकेत आमच्या शिवाय महापौर होणार नाही - अरविंद चव्हाण

**जालना । प्रतिनिधी -** महापालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा गट) दोन अंकीचा आकडा पार केल्याशिवाय राहणार नाही, आणि आमच्या शिवाय कोणत्याही पक्षाला महापौर करता येणार नाही असा दावा जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष माजी आ.अरविंदराव चव्हाण यांनी केला. रविवार रोजी इच्छुकांनी मोठी गर्दी केल्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह उफाळून आला.

जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने रविवार रोजी जिल्हा पक्ष कार्यालय येथे जालना महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या पूर्व तयारीसाठी आणि इच्छूक उमेदवारांना पक्षाचे उमेदवारी अर्ज वितरण करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी श्री चव्हाण बैठकीच्या अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. ते पुढे बोलताना म्हणाले की, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे शिव,शाहू, फुले आंबेडकर यांच्या समतेच्या विचाराशी प्रेरित होऊन पक्ष संघटना उभी करत आहे. त्यांच्या या धर्मनिरपेक्ष विचारामुळे समाजातील सर्व समाज घटक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठीशी आहे.

आगामी महापालिकेच्या निवडणुकीत पक्षातील सर्व समाज घटकातील कार्यकर्त्यांना पक्षाची उमेदवारी देऊन न्याय देण्याचे आश्वासन श्री. चव्हाण यांनी यावेळी दिले. जालना शहराचा सर्वांगीण विकास होऊन शहर स्वच्छ व सुंदर व्हावे यासाठी आमचा पक्ष कटिबद्ध राहील असे श्री चव्हाण यांनी सांगितले.

जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून आपल्या नियुक्तीला अल्प काळ झालेला असताना शहरातील धर्मनिरपेक्ष विचारांच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आपण पक्ष बांधणीला सुरवात केली असून, लवकरच शहर जिल्हा कार्यकारणी व बूथ कमिट्या व तसेच प्रभाग समित्याचे गठण करण्यात येणार आहे,असे शेख मेहमूद यांनी आपल्या भाषणातून सांगितले. काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर बरेचशे पदाधिकारी व कार्यकर्ते आपल्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा मध्ये समाविष्ट झालेले आहे, त्यांना देखील पक्षामध्ये योग्य सन्मान दिला जाईल असे शेख मेहमूद यांनी यावेळी सांगितले. महापालिकेच्या निवडणुकीत पक्षाकडे मजबूत फळी अस्तित्वात येत असल्याने निवडणुकीत पान २ वर




# श्रीक्षेत्र पावनधाम आश्रम येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** भगवंताच्या कृपेने ज्ञानोबारायादी थोर साधु संतांच्या वै. ह. भ. प. प.पू.ग. कृष्णाजी म, व्यवहारे बाबा यांच्या आशीर्वादाने व, वै. ह. भ. प. रंगनाथ म, सिरसाट यांच्या प्रेरणेने तसेच कृष्णाजी बावा सेवाभावी दस्ट सप्ताह कमिटी पांच्या तेजस्वी नेतृत्वाने व , ह.भ.प. गोचरणकिंकर महत प्रभाकर महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाने बदनापूर तालुक्यातील सायगाव डोंगरगाव येथील श्रीक्षेत्र पावनधाम आश्रम येथे दिनांक १७ ते २४ नोव्हेंबर दरम्यान श्री विश्य माऊली ज्ञानोबारायाच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी संजिवन समाधी सोहळ्या निमित्त. अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यासहित भव्य दिव्य राम कथाचे आयोजन करण्यात आले आहे राम कथा प्रवक्ते.ह.भ.प. गोभक्त रामायणाचार्य संजय म.पाचपोर यांच्या सुमधुर अमृतवाणीतून सकाळी ९ ते १२:३० च्या दरम्यान संपन्न होणार आहे या सप्ताह दरम्यान दुपारी २.३० ते ४.३० वाजेच्या दरम्यान दि. १७ रोजी .ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली तांबे नेवासा दि. १८ रोजी भागवताचार्य .ह.भ.प.विजय म. गवळी शास्त्री मेहकर दि.१९ रोजी रामायणाचार्य ह.भ.प. संजय म.पाचपोर अकोला दि.२० रोजी भागवताचार्य श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर म. जळकेकर (जळगांवकर) दि. २१ रोजी.ह.भ.प.अनिल म.पाटील दिनाक २२ रोजी भागवताचार्य .ह.भ.प. पुरुषोत्तम म.पाटील बुलढाणा दि. २३ रोजी भागवताचार्य .ह.भ.प.विशाल म. खोले (मुक्ताईनगर) यांचे हरी किर्तन होणार आहेत तर दि.२४ रोजी .ह.भ.प.महंत. रामेश्वर म.शास्त्री मठाधिपती ब्रह्मनाथ संस्थान, येळंब जि.बीड यांचे काल्याचे किर्तन होणार आहे तरी परिसरातील भावी भक्ताने राम कथेचा कीर्तन श्रावणाचा व महाप्रसादा लाभ घ्यावा असे आवाहन कृष्णाजी बाबा सेवाभायो ट्रस्ट सप्ताह कमिटी श्रीक्षेत्र पावनधाम आश्रम व पंचक्रोशीतील सर्व भक्त परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे

# आध्यात्मिक प्रगतीसाठी मार्गदर्शक असतात ते संत- डॉ प्रमोद कुमावत

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शकांची गरज असते मात्र आध्यात्मिक प्रगतीसाठी मार्गदर्शक असतात ते संत असतात असे प्रतिपादन जुना जालना येथे लाड गवळी समाज मंगलकार्यालयात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात बोलताना केले.

देव म्हणजेच सुख व प्रपंच म्हणजेच दु:ख असा वेदांचा सिध्दांत आहे व संतमंडळी असा आपला अनुभव सांगतात म्हणून प्रपंच हा प्रारब्धावर ठेवून आध्यात्मिक प्रगतीसाठी संतांची संगती केली पाहिजे.

संत तुकाराम महाराजांच्या देव वसे चित्ती त्याची घडावी संगती, ऐसें आवडते मना देवा पुरवावी वासना, हरीजनासवें भेटी न हो अंगसंग तुटी, तुका म्हणे जीणे भले संतसंघष्टने या अभंगावर त्यांनी निरूपण केले.

सुखाचा अचूक पत्ता सांगणारे संत असतात म्हणून त्यांची संगती घडण्याची मागणी संत तुकाराम महाराज करतात. मनाच्या मार्गाने जो जातो तो फसतो तर संतांचे संगतीत जो असतो त्याचा परमार्थ यशस्वी होतो असेही कुमावत महाराज म्हणाले.

प पू गुरुवर्य भगवान महाराज आनंदगडकर यांनी सुरू केलेल्या या सप्ताहाचे हे ११ वर्ष होते. ज्ञानाई पान २ वर



# युनायटेड क्रिकेट असोसिएशनची कार्यकारीणी स्थापन करण्यासाठी बैठकीचे आयोजन

**जालना । प्रतिनीधी -** आंतरराष्ट्रीय युनायटेड क्रिकेट फेडरेशन व राष्ट्रीय युनायटेड क्रिकेट असोसिएशन संलग्नीत महाराष्ट्र राज्य युनायटेड क्रिकेट असोसिएशन यांच्या अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात जिल्हा युनायटेड क्रिकेट असोसिएशन स्थापन करण्यात येत आहेत. जालना जिल्ह्यात सुद्धा जालना जिल्हा युनायटेड क्रिकेट असोसिएशन स्थापन करण्यात येणार आहे. याकरीता शनिवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता कृष्णा आर्केड, प्रयाग हॉस्पीटल जवळ, रेल्वे स्टेशन ते चमन रोड, जुना जालना याठिकणी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

अधिक माहितीकरीता कार्यालय मो.क्र. ८६६८९९२५८६, किंवा शेख अहमेद, अॅड. अमजत पठाण, नागसेन बनकर, शेख चाँद पी.जे., संतोष वाघ, नितीन जाधव, श्रीमती शेख महेजबीन, श्रीमती गिता संगम यांच्याशी संपर्क साधावा.

तरी या सुवर्ण संधीचा जालना जिल्हयातील सर्व आजी माजी क्रिकेट पटु, क्रिकेट प्रेमींनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# संपादकीय पान

## मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!



१७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मराठी माणसांना पोरके करून कायमचे निघून गेले. आज त्यांची १३ वी पुण्यतिथी. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईनचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्राभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

'वंदे मातरम' गीताला दीडशे वर्षे पूर्ण

# हिंदु जनजागृती समितीचा राज्यव्यापी राष्ट्रभक्ती जागरण सप्ताह !






**पुणे -** भारत राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याचे प्रेरणास्थान ठरलेल्या आणि कोट्यवधी भारतियांमध्ये क्रांतीची ज्वाळा चेतविणाऱ्या 'वंदे मातरम्' गीताला यंदा १५० वर्षे पूर्ण झाली. या स्मरणार्थ हिंदु जनजागृती समितीच्या वतीने राज्यभर विशेष राष्ट्रभक्ती जागरण उपक्रम एक सप्ताहभर आयोजित करण्यात आला. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी सामूहिक 'वंदे मातरम्' गायनातून नागरिकांनी मातृभूमीप्रती अभिमान व्यक्त केला.

या उपक्रमास महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सातारा, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, रत्नागिरी, मुंबई आदी ठिकाणी नागरिकांनी राष्ट्रध्वज आणि क्रांतीकारकांचे फलक हातात धरून वंदे मातरम्चा जयघोष केला. महाराष्ट्रासह कर्नाटक आणि गोवा राज्यांतही या उपक्रमाचा विस्तार झाला.

महाराष्ट्र राज्यातील ६० हून अधिक ठिकाणी आयोजित सामूहिक गायन कार्यक्रमात पाच हजारांहून अधिक राष्ट्रभक्त नागरिक, माजी सैनिक, शिक्षक, विद्यार्थी, तसेच विविध सामाजिक आणि हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले. कोल्हापूर येथे आमदार राजेश क्षीरसागर आणि अन्य मान्यवरांनी या उपक्रमाचे उद्घाटन करून देशभक्तीचा संदेश दिला.

हिंदु जनजागृती समितीचे राज्य संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेले 'वंदे मातरम्' हे गीत आज १५० वर्षानंतरही प्रत्येक भारतीयाच्या हृदयात राष्ट्रप्रेमाची ज्वाला चेतवत आहे. या गीताची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी, यासाठी आम्ही शाळा आणि महाविद्यालयांमध्ये संपूर्ण 'वंदे मातरम्' गायले जावे, असे आवाहन करीत आहोत.

# वारकरी महाअधिवेशनात निर्धार : तीर्थक्षेत्रे मद्य-मांसमुक्त व्हावीत; धर्मांतर थांबवण्यासाठी कठोर कायद्याची मागणी!

**आळंदी । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील सर्व तीर्थक्षेत्रे मद्य आणि मांसमुक्त करावीत, तसेच मंदिर परिसरात अन्य धर्मियांच्या प्रचारावर बंदी घालण्यासाठी कठोर कायदा करावा, यांसारख्या प्रमुख मागण्यांसह १९ व्या भव्य वारकरी महाअधिवेशनात महत्त्वपूर्ण ठराव संमत करण्यात आले. 'वारी आळंदीची, राष्ट्र आणि धर्मरक्षणाची' हे ब्रीदवाक्य घेऊन पार पडलेल्या या अधिवेशनात राज्यभरातील एक हजाराहून अधिक वारकरी आणि हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते सहभागी झाले होते.

हिंदु जनजागृती समिती, राष्ट्रीय वारकरी परिषद आणि अन्य संघटनांच्या संयुक्त विद्यमाने येथील सद्गुरू श्री गंगागिरी महाराज मठात कार्तिक वद्य एकादशीच्या निमित्ताने हे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. 'वारकऱ्यांची श्रद्धास्थाने, देवता आणि संत यांच्यावर होणारे आघात' या गंभीर विषयावर मंथन करण्यासाठी राज्यभरातील संत आणि वारकरी एकत्र आले होते.

या वेळी बोलताना प.पू. रामगिरी महाराज म्हणाले की , रामायणातील उदाहरणे विकृत पद्धतीने मांडून आदिवासींचे धर्मांतरण करण्याचे ख्रिस्ती मिशनऱ्यांचे षड्यंत्र हाणून पाडले पाहिजे. सद्गुरू गंगागिरी महाराजांनी २०० वर्षांपूर्वी चारी वर्णाच्या हिंदूंना एकत्र करण्याचे महान कार्य केले. आपणही आपापल्या प्रभावक्षेत्रात हे कार्य केले, तर धर्मांतरण रोखणे शक्य होईल.

ह.भ.प. जनार्दन महाराज मेटे म्हणाले की , संत-महंतांनी संघटित होऊन संदेश देण्याची परंपरा ज्ञानेश्वर माऊलींच्या काळापासून चालत आली आहे; पण आज आळंदीत आरोग्य आणि शिक्षण याचे महत्त्व सांगत ख्रिश्चन मिशनरी आळंदीतील हिंदूंचे धर्मांतरण करत आहेत. याला आपण आळा घातला पाहिजे.

या वेळी हिंदू जनजागृती समितीचे महाराष्ट्र राज्य संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले की , जादूटोणा कायद्याच्या प्रचारासाठी नेमलेली; परंतु देव-धर्माची टीका करणारी महाराष्ट्र शासनाची 'जादूटोणा विरोधी कायद्याची जनजागृती, प्रचार व प्रसार समिती' (झखचउ) तात्काळ बरखास्त करण्यात यावी. तसेच नास्तिक आणि अर्बन नक्षलवादी विचारसरणीचे काही लोक पंढरीच्या वारीमध्ये वारकऱ्यांचा बुद्धीभेद घडवून आणत आहेत; हे त्वरित थांबवले पाहिजे. राज्यातील हिंदुत्ववादी सरकारने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी व्हावी यासाठी सर्व संत-महंतांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या वेळी सरकारशी चर्चेसाठी एकत्र येण्याचे आवाहन श्री. घनवट यांनी केले.

रणरागिणी समितीच्या कु. क्रांती पेटकर यांनी लव्ह जिहादचे भयावह वास्तव मांडून कायदा करण्याची मागणी केली. ह.भ.प. अक्षय महाराज भोसले यांनी तीर्थक्षेत्रे मद्य-मांस मुक्त करणे, इंद्रायणी नदीचे जलशुद्धीकरण करणे यासारख्या मागण्या शासनाकडे लावून धरण्याचे आश्वासन दिले.

अधिवेशनात संमत झालेले प्रमुख ठराव: महाराष्ट्रातील सर्व तीर्थक्षेत्रे मद्य-मांसमुक्त करून त्यांच्या पावित्र्याचे रक्षण करावे आणि मंदिर परिसरात अन्य धर्मियांच्या प्रसारावर बंदी घालावी. हिंदू युवतींच्या संरक्षणासाठी राज्यात 'लव्ह जिहाद विरोधी कायदा' तातडीने संमत करावा. हिंदूंची मंदिरे आणि भूमी बळकावणारा 'वक्फ कायदा' त्वरित रद्द करावा. इंद्रायणी आणि चंद्रभागा नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना करावी. राज्यात गोवंश हत्याबंदी कायद्याची अत्यंत कठोर अंमलबजावणी करावी. पंढरीच्या वारीमध्ये नास्तिकतावादी व अर्बन नक्षलवाद्यांकडून होणारा बुद्धीभेद थांबवावा.

या अधिवेशनाला दंडी स्वामी अमृताश्रमानंद महाराज, ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, ह.भ.प. दत्तात्रय चोरघे महाराज, संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, ह.भ.प. निरंजन शास्त्री कोठेकर महाराज, कै. मामासाहेब दांडेकर स्मृती प्रतिष्ठान, ह.भ.प. बापू महाराज रावकार, ह.भ.प. संग्राम बापू भंडारे हे उपस्थित होते.

पान १ वरुन

## खेड आणि ...

ग्राऊंड आहेत. परंतु महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आणि आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून आता राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये ग्राऊंड उभारणीचे काम हाती घेण्यात आले आहे. काही जिल्ह्यात जागा खरेदी करण्यापासून तर काही जिल्ह्यात विविध संस्था-संघटनांच्या मालकीच्या असलेल्या ग्राऊंडचा आवश्यक तो विकास करून किंवा जागा लीजवर घेऊन तिथे ग्राऊंडची बांधणी करुन त्याची मालकी एमसीएकडे घेण्यात येत आहे. त्यानुसार त्या-त्या जिल्ह्यातील क्रिकेट खेळाडूंना सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. अशा पद्धतीने सोलापूर येथे महापालिकेच्या मालकीचे स्टेडियम एमसीएने चालवण्यासाठी घेतले असून सातारा, कोल्हापूरसह इतरही जिल्ह्यांमध्ये असे काम सुरु आहे.

तसेच एमसीएच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांपासून आयपीएलच्या धर्तीवर सुरवातीला एमपीएल आणि मागील वर्षापासून एमपीएलसोबतच महिला एमपीएल स्पर्धा भरवून संपूर्ण राज्यभरातील गुणी आणि होतकरु खेळाडूंना मोठी संधी उपलब्ध करुन दिली जात आहे. याच स्पर्धेत खेळणाऱ्या काही खेळाडूंची निवड राष्ट्रीय पातळीवर झाली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात राशीन (ता. कर्जत) येथे भव्य असे क्रिकेट ग्राऊंड उभारण्याची घोषणा आमदार रोहित पवार यांनी केली होती आणि मागील वर्षी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा यांच्या हस्ते या ग्राऊंडचे भूमिपूजनही करण्यात आले आहे. त्यासाठी आमदार रोहित पवार हे सदस्य असलेल्या 'रयत'ने जागा उपलब्ध करुन दिली आहे. या ग्राऊंडच्या काही परवानग्या मिळवण्यासाठी तसंच मे २०२५ पासून पाऊसच सुरु असल्याने या ग्राऊंडचे काम अद्याप सुरु झाले नाही. परंतु आता ते लवकरच सुरु होणार आहे.

राशीनच्या या ग्राऊंडसह खेड (ता. कर्जत) येथेही आ. रोहित पवार आणि एमसीएच्या माध्यमातून ग्राऊंड तयार करण्यात येणार आहे. खेडमध्ये मा. आ. डॉ. कुमार सप्तर्षी हे अध्यक्ष असलेल्या 'भारतीय समाज विकास संस्थे'च्या लोकनायक जयप्रकाश नारायण विद्यालयाने या ग्राऊंडसाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच जामखेड तालुक्यातही आमदार रोहित पवार हे स्वखर्चातून भव्य अशा क्रिकेट ग्राऊंडची उभारणी करणार असून त्यासाठी जागाही निश्चित करण्यात आली आहे. लवकरच या ग्राऊंडच्या कामाचे भूमिपूजन होणार आहे. या तीनही ग्राऊंडची उभारणी झाल्यानंतर कर्जत-जामखेड या दोन्ही तालुक्यातील क्रिकेट खेळाडूंप्रमाणेच राज्यातील ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडूंनाही पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत.

## महापालिकेत आमच्या ...

मोठे यश मिळाल्या शिवाय राहणार नाही असा विश्वास शेख मेहमूद यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी राष्ट्रवादी प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस धैर्यशील चव्हाण, महिला प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या शकुंतलाताई कदम, जिल्हा अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष शहाआलम खान, प्रदेश पदाधिकारी भाऊसाहेब गोरे ,मिर्झा अन्वर बेग ,अण्णासाहेब चितेकर, प्रभाकर घेवंदे, आदी पदाधिकाऱ्यांनी आपल्या भाषणातून उपस्थित कार्यकर्त्यांना पक्ष बळकट करण्याचे आवाहन केले. या प्रसंगी फिरोज सौदागर पद्माकर हंडे, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या रिंकल तायड ,विजय सोनवणे, शिवराज जाधव, सतीश वाहुळे, ड शेखर पाटील शीतलताई बरोटे,इमरान बिल्डर, अजीम बागवान, जहीर बिल्डर, ड दीपक नाईक,जावेद अली, शेख मुज्जमिल, सय्यद आरीफ, समीर खैराती, शेख मोसिन शेख समी, शेख युनाफ सोहेल खान , न्यानेश्वर शिरसागर, सौ. सुजाता डांगे, डॉ. रामकृष्ण भोंडा ओमकार उबाळे,राहुल राठोड, जावेद देशमुख, गणेश नौपुते, नरेश रायपल्ली, निर्मला बाई सले, संतोष निकाळजे, राजेश म्हस्के, राजश्री रोकडे, संध्या असलवे, छाया बोर्डे, भारती पाडमुख, लता तोडकर, पुष्पा राऊत, मंदा ढोकळे, राणी शिंदे, जिगर तुपसुंदर, शेख रईस, सालम चाऊस, जबीर शेख, शेख शफीक, सह आदि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिर्झा अन्वर बेग यांनी केले तर उपस्थितांचे आभार शितल ताई बरोटे यांनी मानले, यावेळी जिल्हा अध्यक्ष माजी.आ.अरविंद चव्हाण यांच्या हस्ते पक्षाचे उमेदवारी अर्ज उमदेवाराना देण्यात आले.

## आध्यात्मिक प्रगतीसाठी ...

शिक्षण संस्था, जांब समर्थ येथील हभप पांडुरंग महाराज आनंदें यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह संपन्न झाला आहे. यावेळी गाथ्याचे संशोधक हभप डॉ ऋषीबाबा शिंदे, हभप साक्षी ताई मुळे, हभप डॉ एकनाथ महाराज शिंदे,हभप अमोल गायकवाड, ड महेश उफाड, अशोक चुनखडे, हभप परमेश्वर सानप, भजन सम्राट इंद्रजित अण्णा येवले, ज्ञानेश्वर माऊली औटे, मृदंगाचार्य राम महाराज गोरे, परीसरातील भाविक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोनगाव येथील नेत्र तपासणीत २६१ रूग्णांची तपासणी

**बदनापूर । प्रतिनिधी -** बदनापूर येथील निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्ट व लायन्स नेत्र रुग्णालय चिकलठाणा यांच्या संयुक्त अध्यक्ष डॉ.देवेश पाथ्रीकर यांच्या मार्गदर्शनखाली डोनगाव येथे मोफत नेत्र तपासणी,मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले असून याशिबिरात २६१ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यातील ४६ रुग्णांना मोतीबिंदू निदान झाले आले असून त्यांना शस्त्रक्रियेसाठी तारीख देण्यात आली. या शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत असून रुग्णांचा जाण्या -येण्याचा खर्च देखील निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टच्या वतीने डॉ. देवेश पाथ्रीकर हे करतात. निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्ट या शैक्षणिक संस्थेच्या वतीने सामाजिक उपक्रम म्हणून मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन लायन्स नेत्र रुग्णालय चिकलठाणा यांच्या संयुक्त विद्यमाने गावा-गावात घेण्यात येते. न्यू लाईफ केअर रूग्णालय पाथ्रीकर कॅम्पसचे वैद्यकीय पथकही या वेळी उपस्थित राहून रूग्णांची मोफत तपासणी व मार्गदर्शन करतात.

### वाचकांचे मनोगत

## दिल्ली स्फोटाचा हेतू भारतात दहशतवाद माजविणे

दिल्लीतील लाल किल्ला नजीक झालेल्या स्फोटाने संपूर्ण देश हादरला.या आधी पहलगाम येथे २६ पर्यटकांच्या निघृण हत्या करण्यात आल्या. केंद्र सरकार, गृहमंत्री, पंतप्रधान यांच्यावर देशातील जनता विश्वास ठेवून आहे.भारतातील महत्त्वांच्या शहरात पाकिस्तानने दहशतवादी कारवाया घडवून आणल्या आहेत.केंद्र सरकार मधील मंत्री दहशतवादी कारवाया रोखण्यासाठी कोणाच्या आदेशाची वाट पाहत आहेत.पोकळ घोषणा करून दहशतवादी कारवाया थांबणार नाहीत.त्यासाठी कठोर निर्णय घेण्याची गरज आहे.पहलगाम दहशतवादी घटनेची परतफेड केली नाही.भारतातील राजकीय उलथापालथ करण्यात मंत्री जेवढा वेळ घालवतात त्याच्या कित्येक पटीने देशाच्या संरक्षणासाठी वेळ द्यावा.गृहखात्याला स्फोटाचा थांगपत्ता नाही.अवघा देश भितीच्या सावटाखाली.गुप्तचर संस्थांनी दिलेल्या माहितीनुसार स्फोटाने भरलेल्या ३२ गाड्या वेगवेगळ्या शहरात नेऊन एकाचवेळी मोठे स्फोट घडवून आणण्याची दहशतवाद्यांची योजना होती.लाल किल्ला नजीक झालेल्या स्फोटा करिता आय २० कारचा वापर केला.भारतात धार्मिक तेढ निर्माण करून दंगे घडवण्याची कारस्थाने पाकिस्तानने केल्याची अनेक उदाहरणे आहेत.तरीही भारत सरकारने पाकिस्तानला अद्दल घडवली नाही.अजून किती वाट बघायची दहशतवाद विरोधी निर्णय घेण्याची असे भारतीयांना वाटत आहे.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

## ओजस औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयामध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन




**जालना | प्रतिनिधी -** धरती जनसेवा प्रतिष्ठान शैक्षणिक संकुलातील ओजस कॉलेज ऑफ फार्मसी, जालना येथे राष्ट्रीय बालदिना निमित्त रक्तदान शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

रक्तदान शिबिराला विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले, जे त्यांची करुणा, सामाजिक जबाबदारी आणि मानवतेची सेवा करण्याची वचनबद्धता दर्शवते. स्थानिक रक्तपेढीच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते, ज्यामुळे संपूर्ण कार्यक्रमात योग्य वैद्यकीय देखरेख, सुरक्षा प्रोटोकॉल आणि सुरळीत समन्वय सुनिश्चित करण्यात आला. या शिबिरामध्ये एकूण ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

ओजस कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाचे कौतुक केले आणि तरुणांमध्ये सहानुभूती आणि सामाजिक जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा मानवतावादी उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीत प्राध्यापक आणि स्वयंसेवकांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले.

रक्तदान शिबिराला उल्लेखनीय यश मिळवून दिल्याबद्दल महाविद्यालयाने सर्व रक्तदात्यांचे आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानले. या कार्यक्रमास संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री भागवत शिंदे, ओजस कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. विठ्ठल कुचके, प्रा. पुरुषोत्तम राखुंडे, प्रा. प्रमोद भोसले, प्रा. सादत खान, प्रा. शशिकांत वडले, प्रा. प्रवीण राठोड, प्रा. सय्यद शाहरुख, व महाविद्यालयातील प्राध्यापक आणि इतर कर्मचारी उपस्थित होते

### नामदार भरतशेठ गोगावले यांच्या लोककल्याणकारी कार्यतत्पर कार्यकुशल नेतृत्वाचा वाढता प्रभाव

# शिवसेनेत दिवसेंदिवस इनकमिंग सुरूच

**बोरघर | माणगाव | प्रतिनिधी -** माणगाव तालुक्याच्या मोर्बा विभागातील दहिवली कोंड, पालकरवाडी आणि खरवली विभागातील उमरोळी व पेण तर्फे तळे गावातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी लोकप्रिय नामदार भरतशेठ गोगावले यांच्या कार्यतत्पर, कार्यकुशल आणि लोककल्याणकारी नेतृत्वावर प्रभावीत होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अखेरचा जय महाराष्ट्र करत शिवसेनेत जाहिर पक्ष केला.

माणगाव तालुक्याच्या पेण तर्फे तळे येथील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बाहेर पडत उत्स्फूर्त प्रतिसाद देत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. माणगाव तालुक्यातील पेण तर्फे तळे ग्रामस्थ महिला भगिनींसह अनेक कार्यकर्त्यांनी नामदार मंत्री श्री. भरतशेठ गोगावले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शिवबंधन हातात बांधले.

या कार्यक्रमादरम्यान पेण येथे नव्याने उभारण्यात आलेल्या शिवसेना शाखेचे उद्घाटन मंत्री गोगावले आणि मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. ग्रामस्थांचा सहभाग, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि नव्या शाखेमुळे या भागातील संघटन अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे.

या पक्ष प्रवेशामुळे पेण तर्फे तळे परिसरातील शिवसेनेची ताकद व जनसंपर्क अधिक वाढणार असून पक्ष बांधणीला नवचैतन्य मिळाले आहे.

दिवसेंदिवस माणगाव तालुक्याच्या विविध विभागांतील गावंच्या गावं नामदार भरत शेठ गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश करत आहेत त्यामुळे शिवसेनेत दररोज मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरूच आहे. शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी माणगाव तालुका, खरवली विभागातील उमरोली येथील ग्रामस्थ महिला भगिनी आणि कार्यकर्त्यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश करून राजकीय वातावरणात मोठी खळबळ उडवली आहे. अनेक वर्षे राष्ट्रवादी पक्षात राहूनही गावात ठोस विकासकामे न झाल्याची खंत महिलांनी व्यक्त केली. आमच्या भागाचा विकास होत नाही आमचा आवाज वरच्या पातळीपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे आम्ही गोगावले यांच्या नेत्रतवावर आणि शिवसेनेवर विश्वास ठेवून प्रवेश करत आहोत असे त्यांनी स्पष्ट सांगितले. शिवसेनेच्या विकासकार्यातील गती आणि गावागावातील जनसमर्थन पाहता उमरोली ग्रामस्थ भगिनींचा हा निर्णय माणगाव तालुक्यातील बदलाची नवी दिशा ठरत आहे.



माणगाव तालुक्याच्या मोर्ब विभागातील राष्ट्रवादी कार्यकर्त्याचा शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश

दहिवली कोंड पालकरवाडी येथील राष्ट्रवादी आणि भाजपा पक्षातील कार्यकर्त्यांनी नामदार मंत्री भरत शेठ गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेते जाहीर पक्ष प्रवेश केला.

या वेळी अतिफ टाके, साहिल सतवे, हेमंत पालकर, बासित बंदरकर, हुजेब टाके, रमेश कोळी, संदेश मंडवकर, अमाद बंदरकर, सोहम जाधव ओमकार जाधव, राजबा जाधव इत्यादिनी मान्यवरांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

या पक्ष प्रवेशा वेळी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, युवा जिल्हा अधिकारी विपुल उभारे, तालुका प्रमुख महेंद्र मानकर, तशेच तालुक्यातील शिवसेना युवा सेनेचे पदाधिकारी शिवसैनिक इत्यादी उपस्थित होते.

# आजी माजीचा दबाव व झुंडशाही मोडून काढण्यासाठी आघाडी सज्ज - महेश नळगे

**परतूर | प्रतिनिधी -** नगर परिषदेत आपल्याला मते मिळणार नाहीत म्हणून काही लोकांना खुश करण्यासाठी मुस्लिम व इतर समाजाची दुकाने ऐन दिवाळीत तोडण्याचे काम आजी-माजी या दोघांनीच केले. त्यामुळे नगर परिषद निवडणुकीमध्ये उबाठा, मनसे व वंचित बहुजन आघाडी असे आम्ही तिघे एकत्र येऊन आघाडी केलीय. अशी माहिती शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनी दिली. तसेच आजी-माजी सत्ताधारी हे दोन्ही काळू-बाळू मलिदा खाण्यासाठी मागील ३०-३५ वर्षांपासून एकच आहेत. जनतेला परस्पर विरोधी असल्याचे दाखवून सत्तेसाठी वाटाघाटी करत असतात व जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्याचे काम करत आहेत. म्हणून रावणाची लंका हि सेनापती किंवा कोणत्याही सैनिकांनी जाळली नाही तर ती वानर सेनेने आग लाऊन जाळली हा इतिहास आहे. अगदी तसेच या आजी-माजी सत्ताधाऱ्यांच्या सत्ता रुपी साम्राज्याला आग लावण्यासाठी उबाठा, मनसे व वंचितची आघाडी झालेली आहे व येत्या निवडणुकीमध्ये यांच्या अनैतिक युतीला आग लावण्यासाठी आम्ही तयार आहोत. त्यामुळे आघाडीचे मित्रपक्ष सोबत आले तर त्यांच्या सोबत लढू नसता आम्ही पूर्ण तयारीनिशी सर्व वार्डात लढण्यासाठी सज्ज आहोत असे मत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाप्रमुख रामप्रसाद थोरात यांनी व्यक्त केले. ते उबाठा, मनसे व वंचित यांच्या आघाडी झाल्याबाबत आयोजित पत्रकार परिषदेला संबोधित करत होते.

या पत्रकार परिषदेस उबाठा जिल्हाप्रमुख महेश नळगे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाप्रमुख रामप्रसाद थोरात, उबठाचे उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम, अशोकराव आघाव, उबाठा उपतालुका प्रमुख रामचंद काळे, शहर प्रमुख दत्ता पाटील सुरुंग, संतोष पवार, वतन खंडागळे, आबा कदम, राहुल कदम, डि. एन. केवारे, पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी रामप्रसाद थोरात म्हणाले की, सत्ताधाऱ्यांनी मागील ३०-३५ वर्षात मूलभूत समस्या बाबत स्वतः च्या स्वार्थापायी जनतेचा पूर्णतः भ्रमनिरास केल्याने शहराची बकाल अवस्था झालेली आहे. पैशाच्या म्हणजेच धनशक्तीच्या बळावर दोघांचा परतूर नगरपरिषद मध्ये कारभार जनतेने पाहिलेला आहे. आजी-माजी दोघे मिळून जनतेला आम्ही एकमेकाची विरोधक आहोत किंवा शत्रू आहोत असे दाखवतात, दोघांनी मिळून जनतेच्या डोळ्यात धुळफेक केलेली आहे. परतूर शहर बारामती सारखे करू म्हणता. साध्या मूलभूत गरजा ही शहरवासींना दिलेल्या नाहीत आणि म्हणून हा शब्दप्रयोग कशासाठी करतात असा प्रश्न उपस्थित केला.

या प्राथमिक गरजा अपूर्णच.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख महेश नळगे म्हणाले की, नगरपरिषद मध्ये आघाडीने आजी माजी च्या विरोधात आम्ही दंड थोपटलेले आहेत. शहराच्या जवळ चार किलोमीटर अंतरावर पाणी असतानाही शहरातील जनतेला पाचव्या दिवशी पाणी मिळते. सर्व शहरात मूलभूत सुविधांचा अभाव आहे. शहरातील जवळपास दोन ते अडीच हजार तरुण हे जालना व संभाजीनगरला उद्योग धंद्यासाठी व नोकरीसाठी ये-जा करतात. भूमिगट गटार चे काम म्हणायला ठेकेदाराला दिले मात्र त्या निधीवर दोघांनीच डल्ला मारला. पाच दहा टक्के कमिशन यांना खाण्यामुळेच ठेकेदार पळून गेला. व भूमिगत गटार योजनेचे तीन तेरा वाजले. आमच्या तीन पक्षाची आघाडी झालीय, बाकी मित्र पक्ष सोबत येतील अशी आशा आहे त्यामुळे उमेदवार घोषित करण्यासाठी आतताईपणा तरीपण करणार नाही. मित्रपक्ष सोबत नाही आले तारिले आम्ही तिघे निवडणूक लढण्यास व सर्व उमेदवार निवडून आणण्यास खंबीर आहोत असेही शेवटी नळगे म्हणाले.

### ‘मिले सुर मेरा तुम्हारा’हा संगीतमय कार्यक्रम उत्साहात संपन्न

# शर्मिला केसरकर समाज रत्न पुरस्काराने सन्मानित

**डोंबिवली | प्रतिनिधी -** ऐंशी टक्के समाजकारण,वीस टक्के राजकारण,भाजपा चित्रपट कामगार आघाडीच्या डोंबिवलीच्या शहर अध्यक्षा, म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंटच्या संचालिका-ऑर्गनायझर शर्मिला केसरकर यांचा वाढदिवस डोंबिवली येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. वाढदिवसाप्रित्यर्थ शनिवार दिनांक१५नोव्हेंबर२५रोजी सर्वेश हॉल, टिळक चौक, डोंबिवली पूर्व येथे म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंट प्रस्तुत’मिले सुर मेरा तुम्हारा’हा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी जनजागृती सेवा संस्थेच्यासमाज रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवा निवृत्त कमांडिंग ऑफीसर’ई’परिमंडळ, राष्ट्रपती पदक सन्मानित, समता साहित्य अकादमी महाराष्ट्राचे अध्यक्ष दिलीप नारकर, समुपदेशिका, स्वानंद इन्व्हेस्टाच्या संचालिका चित्रा राऊत, सेवा निवृत्त पोलिस अधिकारी, सिटीझन वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक सदस्य दीलीप शिरसाट, डोंबिवली येथील उषा हॉस्पिलिटीचे संचालक, समाजसेवक, जनजागृतीचे सल्लागार अरविंद सुर्वे, महिला उत्कर्ष समिती महाराष्ट्राच्या कार्याध्यक्षा श्रुती उरणकर, ग्लोबल मालवणी संस्थेचे अध्यक्ष सचिन आचरेकर,साई श्रद्धा विविध कार्यकारी सेवा संस्थेचे अध्यक्ष तसेच आम्ही आहोत ना या सामाजिक संस्थेचे कार्याध्यक्ष कैलास सणस, समाजसेविका शितल कदम, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर आदी मान्यवर उपस्थित होते. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह,शाल, भेटवस्तू, पुष्पगुच्छ असे समाजरत्न पुरस्काराचे स्वरूप होते.या ऑर्केस्ट्रा मध्ये सोशल मीडिया एक्झिक्युटिव्ह तनया केसरकर,स्पोर्ट्स/सिंगर बी.एन.नायक, सिंगर आणि आयडीएटर प्रज्ञा तांबे,सिंगर अनुराधा कोंडाळकर,विणा, अनुश्री चौधरी, जितेंद्र कांबळी, धनंजय बरबडे, अतुल खरे, अतुल देसाई,इंद्रनिल कंडु, नितीन ठाकर,श्री पेंडसे, भालचंद्र कोंडाळकर, मंगेश पारकर,रवी नाईक, उल्हास मैद, संजय पाटील,बाल कलाकार कियान,वॉईस ऑफ मुकेश राजेंद्र काळे, म्युझिक अरेंजर रितेश एंड टीम, व्हिडिओग्राफर संजय सेनगुप्ता या म्युझिक मंत्राच्या सर्व टीम ने विशेष परिश्रम घेऊन हा सदाबहार सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीपणे सादर केला.या ऑर्केस्ट्राचे सुत्रसंचालन दिपक पोखरणकर यांनी केले.शेवटी म्युझिक मंत्राच्या संचालिका-ऑर्गनाझर शर्मिला केसरकर यांनी सर्वांचे आभार मानले.









## वादळी वाऱ्यामुळे सौर पॅनलचे नुकसान



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** सावरगाव म्हस्के येथील शेतकरी आत्माराम पुंजाजी काकडे यांच्या सौर पॅनल चे वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीने नुकसान झाले असून कंपनीने नुकसान भरपाई देण्याची मागणी आत्माराम काकडे यांनी केली आहे.सावरगाव म्हस्के येथे गट क्रमांक २८१ मध्ये आत्माराम काकडे यांचे शेत असून या शेतातील विहिरीवर त्यांनी केएसबी कंपनी चे सौर उर्जा पॅनल बसवलेले आहे २४ ऑक्टोबर रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह अतिवृष्टीने त्यांच्या सौर पॅनेलवर झाडांच्या फांद्या पडल्याने या पॅनलच्या पाट्या तुटून नुकसान झाले आहे.या विषयी ग्राम महसूल अधिकारी यांनी पंचनामा केला असून कंपनीने नुकसान भरपाई देण्याची मागणी श्री काकडे यांनी केली आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**

## सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव येथे महापुरुषांना वंदन



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी** - मानव विकास व पूर्ननिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव येथे आज दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला तसेच भारताचे पहले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू,सुभेदार रामजी सपकाळ व वस्तात लहुजी साळवे यांची यांची जयंती एकत्रित साजरी करण्यात आली. यानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन करण्यात आले.या कार्यक्रम ला विद्यार्थी अध्यक्ष म्हणून स्नेहा खोडके व प्रमुख पाहुणे सुवर्णा जैवळ व सूत्रसंचालन ऋतुजा जाधव हिने केले व आभार गंगासागर खरात हिने मानले. या निमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवन परिचयावर सखोल प्रकाश टाकला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री.सुनीलजी वाकेकर साहेब तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले . कार्यक्रमानिमित्त सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती लाभली.

# शिवरायांचे गडकिल्ले हे गणितीय अभ्यासाचे उत्तम उदाहरण-प्रा. श्रीकांत चिंचखेडकर

### बाल दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळेत गणित कार्यशाळा

**जालना । प्रतिनिधी** - भारत हा काही अडाण्यांचा देश नव्हता. भारताला पूर्वीपासूनच विज्ञान व गणिताचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. आपल्या मोठमोठ्या वास्तु, शिवाजी महाराजांची गडकिल्ले, राजवाडे, भव्य मंदिरे ही एक प्रकारे गणितीय परंपरेची उदाहरणे आहेत, असे प्रतिपादन प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी येथे बोलताना केले.

बाल दिनानिमित्त येथील रेल्वे स्टेशन रोडवरील जिल्हा परिषद शाळेत आयोजित गणित कार्यशाळेत प्रा. चिंचखेडकर यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी तसेच त्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी विविध उदाहरणे देऊन त्यांच्याशी प्रयोगातून गणितीय संवाद साधला. याप्रसंगी उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे, मुख्याध्यापिका सौ. मेहेत्रे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

प्रा. चिंचखेडकर पुढे म्हणाले की, पुरातन गणितीय अभ्यासाचा आपल्याला विसर पडला म्हणून आपल्या मनात गणिताबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड तयार झालेला आहे आणि तो दूर करण्यासाठी आजचा कार्यक्रम आपल्या ते सांगून त्यांनी आपल्या खास शैलीतून मुलांना गणिताविषयी काही गमतीशीर उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांमध्ये असलेली गणिताबद्दलची भीती दूर केली. यात त्यांनी स्वतः बनवलेले गणिताचे वर्किंग मॉडेल्सचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना करून दाखवले. ते प्रात्यक्षिक पाहताना विद्यार्थीवर्गात कुतूहल व जिज्ञासा त्यांच्या डोळ्यात दिसत होती.



विद्यार्थ्यांनीही आपल्या समस्या प्रा. चिंचखेडकर यांच्याशी संवाद साधून दूर केल्या.

विद्यार्थ्यांचा संपूर्ण शैक्षणिक कालावधी हा असाच हसत खेळत व सहजगत्या पूर्ण व्हावा यासाठी श्रीकांत चिंचखेडकर वेगवेगळे प्रयोग व नाविन्यपूर्ण उपक्रम घेऊन येत असतात .या प्रसंगी त्यांनी शाळेतील सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांसमोर त्यांची गणिताची प्रात्यक्षिके करून दाखवली व प्रोत्साहनपर विविध विषयांवर विविध यशस्वी महापुरुषांचे चरित्र सांगून विद्यार्थ्यांमध्ये स्फूर्ती व प्रेरणा जागृत केली. तसेच जिल्हा परिषद मुलांची शाळेने आतापर्यंत विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री. गव्हाणे यांनी केले.

### राज्यस्तरीय शालेय कराटे स्पर्धेसाठी निवड

# विभागस्तरीय शालेय कराटे स्पर्धेत जालना जिल्हा शाईन कराटे-डू च्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने १५ नोव्हेंबर २०२५ रोजी विभागस्तरीय शालेय कराटे स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत जालना जिल्हा शाईन कराटे-डू च्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली व आपले स्थान निश्चित केले

जालना जिल्हा शाईन कराटे-डु चे यशस्वी खेळाडू

प्रथम क्रमांक आलेले व राज्यस्तरीय शालेय कराटे स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू शलमोन गुडेकर जे ई एस कॉलेज,जालना वय गट अंडर -१९,वजन गट -५0kg पहिला क्रमांक

२) कु.तेजल भागडे जे ई एस कॉलेज,जालना वय अंडर -१९, वजन गट -६४kg पहिला क्रमांक ३) कु.पूर्वा



माने श्रीमती इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,रामनगर, जालना

वय गट अंडर -१९, वजन गट -६८kg पहिला क्रमांक

द्वितीय क्रमांक आलेले खेळाडू. १) कु. तनवी खरटमल

नारायणा ई-टेक्नो स्कूल, जालना वय अंडर -१९, वजन गट -३६kg दुसरा क्रमांक २) कु.अश्विनी आजगे श्री गणपती माध्यमिक, व उच्य माध्यमिक विद्यालय,जालना वय गट अंडर -१९, वजन गट -४४kg दुसरा क्रमांक. तृतीय क्रमांक १)दिव्यता कोठारी श्री म स्था जैन इंग्लिश स्कूल,जालना वय गट अंडर-१७, वजन गट -६0kg तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या सर्व विद्यार्थ्यांना सेन्साई रुपेन्द्र पारचा व सेन्साई अमन पारचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

राज्यस्तरीय स्पर्धा येत्या २0 नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर पर्यंत

बारामती, जि. पुणे. येथे होणार आहे.

महावीर ढक्का, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, क्रीडा अधिकारी सिद्धार्थ कदम, क्रीडा अधिकारी आशिष जोगदंड, राजेश राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल, S M S जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री वानगोता, जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल, नारायणा ई टेक्नो स्कूलची मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना पवार, नारायणा ई टेक्नो स्कूलचे डीन व्यंकट राजू गुडला, श्री यादव, प्रशांत प्रेमभारती, रितेश जयस्वाल, गणेश श्रीराम व पालक वर्ग यांनी कौतुक करून पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सिद्धार्थ कॉलेजमध्ये व्याख्यान संपन्न



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी** - सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफराबाद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५0 व्या जयंतीनिमित्त एक विशेष व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमात प्राध्यापक डॉ. निलेश भोसले यांनी लोहपुरुष सरदार पटेल राष्ट्रनिर्मितीतील योगदान या विषयावर प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शन केले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ. एस. पी. जगतवाड यांनी समर्थपणे केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत व कार्यक्रमाची रुपरेषा त्यांनी मांडली. कार्यक्रमाच्या शेवटी आभारप्रदर्शन . प्रा. मनीष बनकर यांनी केले.
या व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख यांनी भूषविले. त्यांनी सरदार पटेल यांच्या एकीकरणाच्या कार्याची माहिती देत विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेण्याचे आवाहन केले.
कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# जालना महापालिका शाळांच्या शिक्षकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण

### मनपा आयुक्त आशिमा मित्तल यांच्या हस्ते उदघाटन



**जालना । प्रतिनिधी** -
जालना शहर महापालिकेच्या वतीने विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे व विद्यार्थी संख्या वाढीस हातभार लावणे या उद्देशाने शिक्षकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाचा उपक्रम राबविण्यात आला आहे. या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन मा. आशिमा मित्तल, जिल्हाधिकारी तथा आयुक्त, जालना शहर महानगरपालिका यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या प्रशिक्षणात शिक्षकांना अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांशी संवाद कौशल्य, वर्ग व्यवस्थापन, शैक्षणिक नवकल्पना इत्यादी विषयांवर मार्गदर्शन देण्यात आले. प्रशिक्षक म्हणून श्री. दीपक दराडे व श्रीमती राधा घुगे यांनी आपल्या अनुभवातून सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले.

महापालिकेच्या शाळांची शैक्षणिक पातळी उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तावृद्धी घडवून आणण्यासाठी अशा प्रकारची प्रशिक्षण सत्रे नियमित आयोजित केली जाणार असल्याचे मा. आयुक्त आशिमा मित्तल यांनी सांगितले.

कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे, शिक्षणाधिकारी फैसल शहा अहेमद तसेच सर्व महापालिका शिक्षक उपस्थित होते.

# किरुबा कविसंमेलन उत्साहात संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - मुद्रा साहित्य सेवा संस्था जालनाच्या वतीने शनिवार १५ नोव्हेंबर रोजी सोनल नगर येथे किरुबा कविसंमेलन उत्साहात संपन्न झाले. प्रा.पंढरीनाथ सारके यांच्या राहत्या घरी स्व. श्री. किसनराव पवार, स्व. सौ. रुख्मणबाई बाबुराव सारके, स्व. श्री. बाबुराव सारके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कि.रु.बा. कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शेष साहित्य संमेलनाचे मुख्य संयोजक ख्यातनाम कवी पांडुरंग गिराम (रोषणगाव) व फुले, शाहू, आंबेडकरी व्याख्याते प्रा. राजकुमार बुलबुले, ज्येष्ठ समाजसेवक रमेश देहेडकर, सतीशकुमार सिंग, प्रा.राजेंद्र भोसले, रेखा बैजल, शिवकुमार बैजल, हभप ज्ञानेश्वर सुराशे महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जातीतल्या सोयरिकींचे दुष्परिणाम दाखवत माणुसकीचे श्रेष्ठ नाते मांडणारी दहशत मोडून, छळवाद टाळून, माणसे शोधून, शक्य नाही का माणुसकीशी सोयरीक करणे?
ही ज्वलंत कविता विनोद जैतमहाल यांनी सादर केली. तर वैशाली फोके यांच्या करते पाठलाग... तेव्हा तू होतो शिखर पोहोचल्याचा अभास देणारा ही स्त्रीवादी कविता सादर करून रसिकांची दाद मिळवली. संजय कुमार सरदार यांनी
असह्य लोकशाही रस्त्यावर रडे येथे,
दीन जनता बिचारी खितपत पडे येथे
ही सामान्य माणसांच्या दुःखद, दैन्य, दारिद्र्यावर भाष्य करणारी रचना सादर केली.
लपवून आसवांना रडतो बाप माझा,
हसवून लेकरांना कुढतोय बाप माझा
या गणेश खरात यांच्या कवितेला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.
वृक्ष तोडली मोठी मानवाने
नाही राहिली लाकडं



जंगल सोडून आता
गावात आली माकडं
या श्रीमंत ढवळे यांच्या कवितेने रसिकांची वाहवा मिळवली. तसेच
जनतेवर लादू नका तुमची मते
जनता कुठे तुम्हाला जुमानते
ही बहारदार कविता दिनेश शेळके यांनी सादर करून रसिकांपुढे लोकशाहीतले वास्तव मांडले.
कधी कळणार आम्हाला
कोण भडकवतो कशासाठी माथी
माणूस वगळून कुठला धर्म नि कुठली पोथी ही वास्तववादी कविता आबासाहेब म्हस्के यांनी सादर केली.
चिंच गोड की आंबा गोड म्हणत
मायीनं पायातला काटा काढला
ही कविता किशोर भालेराव यांनी सादर केली तर अतिथी कवी पांडुरंग गिराम यांनी काय मदतीचा हात त्याची छाटलेली बोटे, नको नको तुझे मढ्यावरलं लोणी, आम्ही जगलो वाचलो पुन्हा उभारू घर, गुलामीचे आम्ही झटकले वारे ही चिंतनीय कविता सादर केली. डॉ. अंचला सिंग यांच्या स्वागत गीताने या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

सूत्रसंचालन सुहास पोतदार व बंडू काळे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. अपर्णा सारके यांनी केले. प्रा. राजेंद्र भोसले यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी प्रा. पंढरीनाथ सारके, प्रा. अपर्णा सारके डॉ. न्यानिशा देसाई, सचिन देसाई, डॉ. अंचला सिंग, डॉ. रंजन सिंग यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी सौ. सुनिता शेळके, डॉ. प्रभाकर शेळके, कवी सुनील लोणकर (दर्द), सौ. ज्योती पाटील, जिजा वाघ,मनीष पाटील, सौ. सविता तेलंगे, शिवाजी तेलंगे, सुधाकर वाहुळे, कवी कैलास भाले, रागिणी काळे, प्रा. महादेव गायकवाड, सौ. राजश्री गायकवाड, सुरेश सोमधाने, पूजा भाले, संतोष देवगिरीकर यांच्यासह मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.